# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतक-यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, तसेच आपद्ग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालू रहावे म्हणून महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील सर्व जातीधर्माच्या एकूण २५० निराधार व गरीब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) वाईतील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये विनाशुल्क शिक्षण देण्याचा व या विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याबाबत सदरहू संस्थेने निर्णय घेतला असून अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती संस्थेला पाठविण्याची कार्यवाही करण्याबाबत मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्र.संकीर्ण - २०१६/प्र.क्र.४३१/१६/विशि-३, दि.०६/०८/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदरचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,
I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 95
दि. 19 AUG 2016

D:\SM\2016-17\New Proposal 2016-17\letters\Final approval draft.doc

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३१/१६/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ६ ऑगस्ट, २०१६

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय:- आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मोफत महाविद्यालयीन शिक्षणाबाबत.

सोबत श्री. प्रतापराव बाबुराव भोसले, अध्यक्ष व विश्वस्त जनता शिक्षण संस्था, वाई (जि.सातारा) यांचे पत्र दि.२७ जुलै,२०१६ पहावे. (प्रत सोबत जोडली आहे).

महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, तसेच आपद्ग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालू रहावे म्हणून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील सर्व जातीधर्माच्या एकूण २५० अशा निराधार व गरीब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) वाईतील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये विनाशुल्क शिक्षण देण्याचा व या विद्यार्थ्यांसाठी चहापान, नाष्टा, भोजन, पुस्तके, गणवेश, वैद्यकिय तपासणी, अंथरूण-पांघरूण, स्नानगृह इ. सुविधांची सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याबाबत सदरहू संस्थेने निर्णय घेतला असून त्यानुसार अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती संस्थेला पाठविण्याबाबतची विनंती केलेली आहे. त्यानुसार अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती सदरहू संस्थेला दि. १५ऑगस्ट, २०१६ पूर्वी देण्याबाबतची विनंती अध्यक्ष व विश्वस्त जनता शिक्षण संस्था, वाई (जि.सातारा) यांनी केली आहे. तरी सदरहू माहिती संस्थेला तात्काळ देण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

(सिध्दार्थ खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- सर्व कुलगुरू/ कुलसचिव, अकृषी विद्यापीठे.

...versity, Kolhapur
...liation/T-2.
3013
Date 11/08/16

CS

Followup by Bidwe — on 1.8.16 —

जावक क्रमांक :
दिनांक : 27 JUL 2016

प्रतापराव बाबुराव भोसले
अध्यक्ष व विश्वस्त
जनता शिक्षण संस्था, वाई
फोन – ०२१६७– २८५९९९
मो. ९४२२६००४२५
९८९०६७४६५५

मुख्य सचिवांचे कार्यालय
दिनांक 30 JUL 2016
1759507

प्रति,
मा. श्री. स्वाधीन एस. क्षत्रीयसो.
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन
६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय
मुंबई – ४०००३२

विषय:– **आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मोफत महाविद्यालयीन शिक्षणाबाबत.**

महोदय,

महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, तसेच आपद्ग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालू रहावे म्हणून महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील सर्व जातीधर्माच्या एकूण २५० अशा निराधार व गरीब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) वाईतील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये विनाशुल्क शिक्षण देण्याचा व या विद्यार्थ्यांसाठी चहापान, नाष्टा, भोजन, पुस्तके, गणवेश, वैद्यकीय तपासणी, अंथरुण–पांघरुण, स्नानगृह इ. सुविधांची सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याचा संस्थेचा निर्णय आम्ही यापूर्वी दिनांक ०४ एप्रिल. २०१६ रोजी सादर केलेल्या पत्राद्वारे आपणांस कळविलेला आहे. तसेच अशा गरजू विद्यार्थ्यांची माहिती त्यांच्या आमच्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी वर्तणूकीच्या दाखल्यासह शासनाकडून मिळावी अशी आम्ही आपणांस विनंती केली होती. महाराष्ट्रातील जिल्हाधिकारी व आयुक्त यांनी अशा स्वरुपाची माहिती आमच्या संस्थेस पाठविण्याच्या आपल्या कार्यालयाच्या आदेशाची प्रत आम्हाला मिळालेली आहे. महाराष्ट्रातील काही जिल्हाधिकाऱ्यांनी तहसिलदार व प्रांत यांना अशी माहिती पाठविण्याचे जे आदेश दिलेले आहेत त्यांचीही प्रत आम्हाला मिळालेली आहे, परंतु आजअखेर आमच्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी महाराष्ट्रातील एकाही जिल्हयातील आपद्ग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची माहिती मिळालेली नाही. तसेच कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने आजअखेर आमच्या प्रकल्पास प्रत्यक्ष भेट देवून आमच्या उपक्रमाची दखल घेतलेली नाही. परंतु आता फार थोडा वेळ उरल्यामुळे दिनांक १५ ऑगस्ट २०१६ पूर्वी आपद्गस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची माहिती संस्थेस प्राप्त होण्याची व्यवस्था करावी म्हणजे सदर विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात विनाशुल्क प्रवेश देवून त्यांची मोफत निवास व्यवस्था करणे आम्हाला सोईचे होईल.

कळावे.

DS(B)
DS(K)
2/8/16
Imm

We spoke.
This is an excellent offer.
Let me know.
CS.
29.7.16

PS/HE&TE
ACS/R&R

Chief Secretary
Government of Maharashtra

प्रतापराव भोसले
अध्यक्ष
जनता शिक्षण संस्था, वाई

Pl. discuss urgently
1/8